## A.1.6 जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम:

### B. 16 औषधे व साधनसामुग्री पुरवठा:

जिल्हा व मनपा कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांना तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये येथे जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत गरोदर तथा ४२ दिवसा पर्यंतच्या

स्तनदा माता व एक वर्षापर्यंतच्या आजारी बालकास लागणाऱ्या औषधे व साधनसामग्रीचा पुरवठा JSSK EDL प्रमाणे राज्य स्तरावरून करण्यात येईल.

सर्वसाधारण सूचना :

जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या आरोग्य संस्थांना प्रसूतीच्या प्रमाणात औषधे साधनसामुग्री राज्यस्तरावरून दिले वितरण यादीप्रमाणे वितरित करावीत. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी शासकीय वैद्यक महाविद्यालये रुग्णालये व मनपा यानी नोदविलेल्या मागणीप्रमाणे औषध साठा साधनसामुग्री संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालये रुग्णालये व मनपा यांना पुरव करावा. तसेच औषधांची कमतरता भासल्यास मोफत औषध पुरवठा योजने अंतर्गत प्रा. औषधी साठ्यामधून लागणाऱ्या औषधाची गरज भागवावी (कोणत्याही परिस्थितीत लाभाथ्य औषध व साधनसामग्री बाहेरील खाजगी दुकानातून खरेदी करण्यासाठी चिठ्ठी लिहून देण्य येऊ नये.)

- शासकीय आरोग्य संस्थांमध्ये येणाऱ्या सर्व गरोदर माता व ४२ दिवसा पर्यंतच्या स्तन मातांना तसेच वर्षापर्यंतच्या आजारी बालकास लागणारी सर्व औषधे व साधनसाम मोफत मिळेल याची दक्षता घ्यावी.

नॅशनल आयर्न प्लस इनिशीएटीव्ह अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार तसेच कार्यालयामार्फत वारंवार दिलेल्या परिपत्रक सुचनानुसार Tab. IFA, Tab. Calcia Carbonate + Vit D3 व Tab. Albendazoleही औषधी लाभार्थीना वितरीत करा जेणेकरून जास्तीत जास्त मातांना व बालकांना सदर औषधांचा लाभ मिळू शकेल.